सन २०१६ या वर्षी पिकांचे नुकसान होऊ नये याकरिता कृषिपंपाना १२ तासांचा थ्री फेज वीज पुरवठा केलेल्या कार्यवाहीस मान्यता देण्याबाबत व महावितरण कंपनीस अनुदान देणेबाबत.

महाराष्ट्र शासन

उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग

शासन निर्णय क्रमांक : संकिर्ण-२०१६/प्र.क्र.३६५/ऊर्जा-५

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

दिनांक : ०५ मे, २०१८.

संदर्भ :- उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक : संकिर्ण-२०१६/ प्र.क्र.३६५/ऊर्जा-५, दि. ३ मे, २०१८

शासन निर्णय :-

उपरोक्त दिनांक ०३ मे, २०१८ च्या संदर्भिय शासन निर्णयान्वये, सन २०१६ या वर्षी राज्यातील पिकांचे नुकसान होऊ नये म्हणून कृषीपंपाना १२ तास थ्री फेज अतिरिक्त वीजेचा पुरवठा केलेल्या कार्यवाहीस मान्यता देण्यात आली असून व सदरचा वीज पुरवठा करण्यासाठी महावितरण कंपनीस आलेला अतिरिक्त खर्च रु. ११५४.०३ कोटी या रकमेची प्रतिपूर्ती महावितरण कंपनीस अनुदान स्वरुपात करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्या अनुषंगाने महावितरण कंपनीस सदर रकमेची प्रतिपूर्ती ही कृषी पंपाच्या वीज दर सवलतीचे अनुदान म्हणून देण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे. तसेच सदर वीज दर सवलतीचे अनुदान देण्यासाठी होणारा खर्च, उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या मागणी क्र. के-६, ८००, इतर खर्च (००) (००) (०१) कृषिविषयक व यंत्रमागविषयक प्रशुल्क कमी करण्यासाठी वीज वितरण/पारेषण लायसनधारकांना अर्थसहाय्य (कार्यक्रम) ३३, अर्थसहाय्य (२८०१२६१५) या लेखा शिर्षाखाली, सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पात मंजूर व उपलब्ध असलेल्या तरतुदीतून भागविण्यात यावा.

२. सदर शासन निर्णय, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१८०५०५१८१३०४९६१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Bhimashankar Yallappa Manta

Digitally signed by Bhimashankar Yallappa Manta
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Industries,Energy And Labour Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=873ce9a279d9561ff0cbf658e05b823c67c79dcac309fc4ebdac035d6aeec2a0, cn=Bhimashankar Yallappa Manta
Date: 2018.05.05 18:17:06 +05'30'

(भि.य.मंता)
शासनाचे उप सचिव

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव
३. मा.मंत्री (ऊर्जा) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा.राज्यमंत्री (ऊर्जा) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. उर्वरित सर्व मा.मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई

६. मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद / विधानसभा, विधानभवन, मुंबई
७. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
८. अपर मुख्य सचिव (नियोजन), मंत्रालय, मुंबई
९. अपर मुख्य सचिव (वित्त), मंत्रालय, मुंबई
१०. प्रधान सचिव (व्यय), मंत्रालय, मुंबई
११. सर्व मंत्रालयीन विभाग
१२. सचिव,महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, वर्ल्ड ट्रेड सेंटर, सेंटर नं.१, १३ वा मजला, कफ परेड, मुंबई-०५.
१३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)(लेखा परीक्षा) महाराष्ट्र-१, मुंबई-४०० ०२०.
१४.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-२, नागपूर.
१५. अधिदान व लेखाधिकारी (अराप/रालेवि-१), मुंबई
१६. अधिदान व लेखाधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई
१७. निवासी लेखाधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई
१८. अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी, प्रकाशगड, बांद्रा (पूर्व) मुंबई-५१
१९. कक्ष अधिकारी, वित्त विभाग (अर्थसंकल्प/व्यय-१६), मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
२०. अवर सचिव (ऊर्जा-३), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
२१. कक्ष अधिकारी (ऊर्जा-५), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
२२. सर्व कार्यासने (ऊर्जा), मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
२३. निवडनस्ती- ऊर्जा-५.